संगीत नाटक अकादमी पुरस्कार विजेत्या
मराठी कलावंतांचा सत्कार करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. संनाअ २४१९ (१२) /प्र. क्र.२२२/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २९ ऑगस्ट, २०१९

वाचा :- १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. संनाअ ४५१३ (२) /विकस/ प्र.क्र.१२४/सां.का.४, दिनांक १६ जुलै, २०१३
२) शासन शुध्दीपत्रक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. संनाअ-४५१३ (२)/ विकस/प्र.क्र.१२४/सां.का.४, दिनांक ०३ सप्टेंबर, २०१३
३) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांचे पत्र क्र.सां.का.स./२९९१, दिनांक २६ ऑगस्ट, २०१९

प्रस्तावना :-

उपर्निर्दिष्ट शासन निर्णय क्र. १ व शासन शुध्दीपत्रक क्र. २ अन्वये संगीत नाटक अकादमीच्या पुरस्कार विजेत्या महाराष्ट्रातील कलावंतांचा प्रत्येकी रुपये १,००,०००/- (रुपये एक लक्ष फक्त) इतकी रक्कम त्यांच्या सन्मानप्रित्यर्थ देऊन राज्य शासनाकडून सत्कार करण्यात येतो. सन २०१८ च्या संगीत नाटक अकादमी पुरस्कार विजेत्या कलावंतांना सन्मानित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१८ च्या खालील नमुद संगीत नाटक अकादमी पुरस्कार विजेत्यांना राज्य शासनाच्यावतीने सन्मानित करण्यासाठी खालील प्रमाणे सन्मान रक्कम मंजुर करण्यात येत आहे :-

अ.क्र.	सत्कारार्थीचे नाव	रक्कम
१.	श्रीमती सुहास जोशी	रुपये १,००,०००/-
२.	श्री.सुरेश वाडकर	रुपये १,००,०००/-
३.	श्री.राजीव नाईक	रुपये १,००,०००/-
४.	उस्ताद झाकीर हुसैन	रुपये १,००,०००/-
	एकूण रुपये	**४,००,०००/-**

२. उपरोक्त एकूण रुपये ४,००,०००/- (रुपये चार लाख फक्त) हा खर्च मागणी क्र. झेडडी-२, २२०५, कला व संस्कृति, (००) १०२, कला व संस्कृती प्रचालन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना, (०२) राज्य नृत्य, नाट्य, तमाशा व संगीत महोत्सव, (०२) (०२) राज्य नृत्य, नाट्य, तमाशा व संगीत महोत्सव (२२०५ १५०७) ५० इतर खर्च या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी तसेच लेखाधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग-३, अ.क्र.४, परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/ प्र.क्र.९२/ अर्थ-३, दि. ०८ जुलै, २०१९ मधील सर्व परिच्छेद व परिशिष्टातील अटींनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांची राहील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०८२९१६१७३१३१२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
Date: 2019.08.29 16:32:08 +05'30'

(विलास रा. थोरात)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
८. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
११. निवड नस्ती, सां.का.४